विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांचेसमोर

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ अन्वये पुनरिक्षण अर्ज)

पुनरिक्षण अर्ज क्र २२६ / २०२६

१. श्री विशाल गोकुळ शिंदे, (फ्लॅट क्र बी १७०३),
२. श्री विनायक वसंत लोखंडे, (फ्लॅट क्र बी ९०४),
दोघे रा मार्वल आल्बेरो सहकारी गृहरचना संस्था मर्या,
स नं ४१, अंगराज ढाब्यासमोर, कोंढवा येवलेवाडी रोड,
कोंढवा बु., पुणे ४११ ०४८ — अर्जदार

विरुध्द

१. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे
ऑ ई/३, मार्केटिंग फेडरेशन इमारत, पहिला मजला,
हमाल भवनजवळ, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ४११ ०३७
२. श्री सादिक जाफर,
रा फ्लॅट नं डी ८०२, मार्वल आल्बेरो सहकारी गृहरचना संस्था मर्या,
स नं ४१, अंगराज ढाब्यासमोर, कोंढवा येवलेवाडी रोड,
कोंढवा बु., पुणे ४११ ०४८
३. मार्वल आल्बेरो सहकारी गृहरचना संस्था मर्या,
स नं ४१, अंगराज ढाब्यासमोर, कोंढवा येवलेवाडी रोड,
कोंढवा बु., पुणे ४११ ०४८ — प्रतिवादी

विभागीय सह-निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन, पुणे विभाग, पुणे

१. श्री निलेश माणिकराव कामठे,
२. श्री अमोल कोंडे,
दोघे रा मार्वल आल्बेरो सहकारी गृहरचना संस्था मर्या,
स नं ४१, अंगराज ढाब्यासमोर, कोंढवा येवलेवाडी रोड,
कोंढवा बु., पुणे ४११ ०४८ — त्रयस्थ पक्षकार

अर्जदार यांनी प्रतिवादी क्र १, उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे यांनी दि १९.०६.२०२६ रोजी कलम १५४ ब २३ अन्वये दिलेल्या आदेशा विरुध्द सदरचा पुनरिक्षण अर्ज दाखल केला आहे. सदर पुनरिक्षण अर्जातील स्थगिती अर्जावर दि २८.०७.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार यांचेवतीने ॲड पालवे, ॲड सप्रे व प्रतिवादी क्र २ यांचेतर्फे ॲड हिंगे यांची उपस्थित राहून म्हणणे मांडले. त्रयस्थ पक्षकार क्र १ श्री कामठे यांनी उपस्थित राहून सदर प्रकरणात त्रयस्थ पक्षकार म्हणून समाविष्ट करणेचा अर्ज दाखल केला.

अर्जदार यांचेवतीने खालीलप्रमाणे म्हणणे मांडण्यात आले.

१. प्रतिवादी क्र १ यांनी कायद्यातील तरतूदींचे उल्लंघन करुन व दाव्यामध्ये दाखल करण्यात आलेले कागदोपत्री पुरावे विचारात न घेताच दि १९.०६.२०२६ रोजीचे आदेश पारीत केले असल्याने अर्जदार यांनी त्या विरुध्द सदरचा पुनरिक्षण अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र १ यांनी दि १५.१२.२०२५ रोजी कलम १५४ ब २७ अन्वये प्रतिवादी क्र २ यांना कागदपत्रे उपलब्ध करुन देणेबाबतचा आदेश पारीत केला होता. अर्जदार यांनी सदर आदेशाचे पूर्णपणे विहीत मुदतीत पालन केलेले आहे. अर्जदार यांनी दि २९.१२.२०२५ रोजी प्रतिवादी क्र २ यांना निर्धारित शुल्क भरुन कागदपत्रे स्विकारणेबाबत कळविले होते. त्यानुसार प्रतिवादी क्र २ यांनी रक्कम रु १८७०/- चा भरणा करुन कागदपत्रे स्विकारलेली आहेत.

३. दि ३०.१२.२०२५ रोजी प्रतिवादी क्र २ यांनी स्वत:च्या स्वाक्षरीने सर्व कागदपत्रे प्राप्त झाल्याची व ती तपासल्याची तसेच त्याबाबत कोणतीही तक्रार किंवा हरकत नसल्याची लेखी पोहोच दिलेली आहे. प्रतिवादी क्र १ यांचे आदेशाचे पालन झालेले असताना देखील प्रतिवादी क्र २ यांनी दि ०२.०१.२०२६ रोजी प्रतिवादी क्र १ यांचेकडे अर्जदार यांना अपात्र करणेबाबत अर्ज दिलेला होता.

४. प्रतिवादी क्र २ यांनी त्यांचे अर्जामध्ये त्यांनी कागदपत्रे प्राप्त झाल्याबाबत स्वतः दिलेली लेखी पोहोच, कागदपत्रे स्वीकारल्याची बाब व हरकत नसल्याची नोंद जाणीवपूर्वक लपविली होती. अर्जदार यांनी प्रतिवादी क्र १ यांचे आदेशाचे पालन सिद्ध करणारी सर्व कागदपत्रे, शुल्क पावती, संस्थेचे पत्र, लेखी पोहोच व इतर पुरावे प्रतिवादी क्र १ यांचेकडे सादर केले होते.

५. अर्जदार यांनी वारंवार मागणी करुनही व ती उपलब्ध करुन देण्याचे प्रतिवादी क्र १ यांनी निर्देश देवूनही प्रतिवादी क्र २ यांनी तक्रार अर्जाची प्रत अर्जदार यांना दिलेली नाही. अर्जदार यांना नैसर्गिक न्यायतत्वानुसार सुनावणीची, म्हणणे सादर करण्याची कोणतीही संधी उपलब्ध करुन न देताच प्रतिवादी क्र १ यांनी दि १९.०६.२०२६ रोजीचे आदेश पारीत केले आहेत. सदर आदेश पारीत करताना अर्जदार यांनी दाखल केलेले पुरावे व प्रतिवादी क्र २ यांनी कोणतीही तक्रार अथवा हरकत नसल्याची दिलेली कबुली विचारात घेण्यात आलेली नाही.



प्रतिवादी क्र १ यांच्या आव्हानित आदेशात आदेशाचे पालन झाले नाही असा निष्कर्ष नोंदविला असला तरी त्या निष्कर्षामागे कोणतीही स्वतंत्र कारणमीमांसा नमूद करण्यात आलेली नाही. आदेशात कोणती कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत, कोणत्या कायदेशीर तरतुदीचे उल्लंघन झाले किंवा कोणता पुरावा ग्राह्य धरला याचा स्पष्ट उल्लेख न करताच कारणरहित आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र १ यांचे दि १५.१२.२०२५ व दि १९.०६.२०२६ रोजीच्या आदेशातील परस्परविरोधी आहेत. प्रतिवादी क्र १ यांचे पूर्वीच्या आदेशात काही कागदपत्रे देणे आवश्यक नसल्याचे नमूद करून नंतर त्याच कारणावरून अपात्रता लावणे ही विसंगत निर्णयप्रक्रिया आहे.

७. अर्जदार यांनी प्रतिवादी क्र १ यांचे कलम १५४ ब २७ अन्वयेच्या आदेशाचे पूर्ण पालन झाल्यानंतर कलम १५४ ब २३ अंतर्गत अपात्रतेची कारवाई सुरू टेवण्याचा कोणताही कायदेशीर आधार उरलेला नाही. प्रतिवादी क्र १ यांनी स्वतः दिलेल्या प्रक्रियात्मक निर्देशांचे पालन झाले की नाही यांची

खातरजमा न करता अंतिम आदेश पारित केला आहे. अशाच स्वरुपाच्या नाईन हिल्स सहकारी गृहरचना संस्था या प्रकरणात प्रतिवादी क्र १ यांनी दोन्ही पक्षांचे म्हणणे, सर्व पुरावे व कागदपत्रांचा विचार करुन कारणांसहीत आदेश दिला होता. मात्र सदर प्रकरणात त्यांनी उपलब्ध पुरावे, लेखी कबुलीकडे पूर्ण दुर्लक्ष करून भिन्न स्वरुपाचा आदेश पारीत केला आहे.

८. प्रतिवादी क्र १ यांचे आदेशानुसार अर्जदार यांच्या रिक्त झालेल्या जागा भरणेबाबत कार्यवाही सुरु करण्यात आलेली असून त्याबाबतची सभा दि ३०.०७.२०२६ रोजी घेण्यात येणार आहे. तसेच अर्जदार यांचे अपात्रतेमूळे संस्थेमध्ये वीज बिले, सुरक्षा बिले व इतर आवश्यक दैनंदिन कामकाज करणेस अडथळा निर्माण झालेला आहे. त्यामूळे पुनरिक्षण अर्जाचा अंतिम निर्णय होई पर्यंत प्रतिवादी क्र १ यांचे आदेशास स्थगिती देण्यात यावी अन्यथ अर्जदार यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे.

<u>प्रतिवादी क्र २ यांचे म्हणणे खालीलप्रमाणे</u>

१. प्रतिवादी क्र २ यांनी दि १८.०३.२०२५ रोजी संस्थेकडे कागदपत्रांची मागणी केली होती सदर अर्ज संस्थेने दि २०.०३.२०२५ रोजी स्विकारलेला आहे. त्यानुसार कायद्याप्रमाणे त्यांनी ४५ दिवसांच्या आत कागदपत्रे उपलब्ध करून देणे आवश्यक होते तथापि ती मुदतीत दिली गेली नाहीत. या कारणास्तव प्रतिवादी क्र १ यांनी दिलेला आदेश कायदेशीर व योग्य आहे.

२. संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष व सचिव यांनी प्रतिवादी क्र १ यांच्या कलम १५४ ब २७ अन्वयेच्या आदेशाचे पालन न केल्याने, प्रतिवादी क्र १ यांनी त्यांना योग्यरित्या दि १९.०६.२०२६ रोजीच्या कलम १५४ ब २३ (१) (iii) अन्वयेच्या आदेशाने पाच वर्षांसाठी अपात्र ठरविले आहे. पुनरीक्षण अर्जाचे अधिकारक्षेत्र मर्यादित व पर्यवेक्षीय स्वरूपाचे असून त्यामध्ये केवळ अधिकारक्षेत्रीय चूक किंवा गंभीर प्रक्रियात्मक अनियमितता तपासली जाऊ शकते त्याव्दारे वस्तुस्थितीचे पुनर्मूल्यांकन करता येत नाही.

३. अर्जदार यांनी उपस्थित केलेले बहुतांश मुद्दे तथ्यांचा पुनर्विचार घडवून आणण्याचा प्रयत्न असून ते पुनरीक्षणाच्या कक्षेबाहेर आहेत. प्रतिवादी क्र २ यांनी कागदपत्रांची मागणी दुर्भावनेने केली असल्याचे अर्जदार यांचे म्हणणे चूकीचे असून, संस्थेचया सभासद म्हणून त्यांना कागदपत्रे मागण्याचा कायदेशीर अधिकार आहे. तसेच सभासद हा समितीचा सदस्य असला तरी कागदपत्रे मिळविण्याचा त्याचा हक्क कमी होत नाही.

सह-निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र शासन
सत्यमेव जयते
पुणे विभाग, पुणे

४. संस्थेने कागदपत्रे प्रतिवादी क्र १ यांचे कार्यालयात जमा करणे किंवा पाठविणे म्हणजे सभासदास कागदपत्रे पुरविणे होत नाही ती कागदपत्रे थेट सभासदाला देणे आवश्यक आहे. संस्थेने नंतर काही कागदपत्रे दिल्याचे नमूद केले असले तरी ती आदेशातील कालावधीत व अपेक्षित व्याप्तीप्रमाणे पुरविण्यात आलेली नव्हती, त्यामुळे त्यास आवश्यक व पूर्ण अनुपालन झाले असे ग्राह्य धरता येणार नाही. संस्थेने प्रतिवादी क्र १ यांचेकडे अनुपालन अहवाल सादर केलेला नव्हता.

५. अर्जदार यांना पुरेशी सुनावणीची संधी देण्यात आली होती. त्यांना अनेक वेळा तसेच शेवटची संधी देखील स्पष्टपणे नमूद करुन देण्यात आली होती. अर्जदार यांनी नमूद केलेल्या नाईन हिल्स प्रकरणातील परिस्थिती या प्रकरणापेक्षा वेगळी असल्याने त्याचा आधार लागू होणार नाही. मा उच्च न्यायालयाच्या शाहिद तांबोळी परिच्छेद २७, कैलाश माहेश्वरी या प्रकरणांतील निर्णयांनुसार कागदपत्रे

मुदतीत थेट सभासदाला देणे बंधनकारक आहे. केवळ कार्यालयात कागदपत्रे जमा करणे पुरेसे नाही असे मा उच्च न्यायालयाच्या श्रीकांत रमाने प्रकरणातील परिच्छेद क्र १७ ते २४ मध्ये स्पष्ट केले आहे.

६. मा उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र ५०९६/२०२२ मधील दि २०.०७.२०२३ रोजीच्या आदेशात कागदपत्रे पुरविण्याच्या कर्तव्यास अपात्रतेच्या शिक्षेची जोड असल्याने ती तरतूद आदेशात्मक आहे. रिट याचिका क्र ७७५७/२०२६ मधील दि ०१.०७.२०२६ रोजीचा आदेश सदर प्रकरणाशी सुसंगत आहे. या दोन्ही प्रकरणात कागदपत्रे निबंधकांकडे जमा करणे हे सभासदास कागदपत्रे पुरविणे नाही तसेच जवळपास २६३ व ३७७ दिवसांच्या विलंबाने कागदपत्रे प्राप्त झाली तरी कसूर भरुन निघत नसल्याचे नमूद आहे. प्रस्तुत प्रकरण संस्थेने रक्कम रु १८७०/- शुल्क स्विकारल्याचे असल्याने कलम १५४ ब ८ (२) ची मुदत सुरु झाली याबाबत वाद नाही. तरीही आदेशीत कालावधीची कागदपत्रे मुदतीत व थेट सभासदास पुरविली गेली नाहीत. त्यामुळे उपरोक्त दोन्ही निवाड्यांचा एकत्रित परिणाम यास लागू होतो.

निरिक्षण

१. प्रतिवादी क्र ३, मार्वल आल्बेरे सहकारी गृहरचना संस्था मर्या, कोंढवा बु., पुणे ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदींनुसार नोंदविण्यात आलेली सहकारी गृहरचना संस्था आहे. अर्जदार हे संस्थेचे पदाधिकारी, प्रतिवादी क्र २ हे संस्थेचे सभासद तर प्रतिवादी क्र १ हे संस्थेचे निबंधक आहेत. प्रतिवादी क्र १ यांनी कलम १५४ ब २३ अन्वयेच्या आदेशाने अर्जदार या संस्थेच्या अध्यक्ष व सचिवांना दि १९.०६.२०२६ रोजीच्या आदेशाने अपात्र केले असल्याने त्या विरुध्द अर्जदार यांनी सदरचा पुनरिक्षण अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र १ यांनी कलम १५४ ब २७ अन्वये दि १५.१२.२०२५ रोजी दिलेल्या आदेशाचे अर्जदार यांनी पूर्ण अनुपालन केले असून त्यानुसार सर्व कागदपत्रे प्रतिवादी क्र २ यांना उपलब्ध करुन दिलेली आहेत, निर्धारित शुल्क संस्थेने स्विकारुन, प्रतिवादी क्र २ यानी दि ३०.१२.२०२५ रोजी स्वत:च्या स्वाक्षरीने सर्व कागदपत्रे प्राप्त झाल्याची व त्यांची कोणतीही हरकत नसल्याची लेखी पोहोच दिली असल्याचे अर्जदार यांनी नमूद केले आहे. संबंधित पोहोच, शुल्काची पावती व इतर समकालीन दस्तऐवज उपलब्ध असताना, प्रतिवादी क्र १ यांनी अर्जदार यांना तक्रार अर्जाची प्रत उपलब्ध करुन न देता, अर्जदार यांना वैयक्तिक नोटीस देवून, नैसर्गिक न्यायतत्वानुसार सुनावणीची संधी न देताच, कलम १५४ ब २३ मधील तरतूदींचे उल्लंघन करुन आदेश पारीत केला असल्याचे म्हणणे अर्जदार यांनी मांडले आहे.

३. संस्थेने प्रतिवादी क्र २ यांनी मागणी केलेली पूर्ण कागदपत्रे कलम १५४ ब ८ मधील मुदतीत थेट सभासदाला उपलब्ध करुन दिलेली नाहीत, केवळ काही कागदपत्रे नंतर उपलब्ध करुन देणे अथवा कार्यालयात ठेवणे हे कलम १५४ ब २७ अन्वयेचे कायदेशीर अनुपालन मानता येणार नसल्याचे प्रतिवादी क्र २ यांनी नमूद करुन, प्रतिवादी क्र १ यांनी संबंधितांना नैसर्गिक न्यायतत्वानुसार सुनावणीची पुरेशी संधी दिली असून, कलम १५४ ब २७ च्या आदेशाचे पालन पूर्ण न झाल्यानेच योग्यरित्या कलम १५४ ब २३ अन्वयेच्या आदेशाव्दारे अर्जदार या संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांनाच अपात्र केले असल्याने संबंधित आदेश कायम ठेवण्याबाबत म्हणणे सादर केले आहे.

४. अर्जदार यांनी कागदपत्रे प्राप्त झाल्याबाबत व काही हरकत नसल्याबाबत प्रतिवादी क्र २ यांची पोहोच सादर केली असली तरी त्यास प्रतिवादी क्र २ यांनी नकार दिलेला आहे तसेच प्रतिवादी क्र २ यांनी

मागणी केलेली सर्व कागदपत्रे संस्थेने प्रतिवादी क्र १ यांच्या दि १५.१२.२०२५ रोजीच्या कलम १५४ ब २७ अन्वयेच्या निर्देशानंतर देखील पुरविली नसल्याचे दिसून येते. संबंधित कागदपत्रातील काही कागदपत्रे विलंबानंतर देखील प्रतिवादी क्र २ यांना उपलब्ध झाली नसल्याचे निरीक्षण नोंदवून, प्रतिवादी क्र १ यांनी अर्जदार यांना नैसर्गिक न्यायतत्वानुसार सुनावणीची संधी दिल्यानंतरच दि १९.०६.२०२६ रोजीचा आदेश पारीत केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. कागदपत्रांची पुर्तता, त्याबाबतचा कलम १५४ ब ८ मध्ये नमूद असलेला अवधी व प्रतिवादी क्र २ यांनी भरणा केलेली रक्कम विचारात घेता प्रतिवादी क्र २ यांनी सादर केलेले मा उच्च न्यायालयाचे निर्णय सदर प्रकरणास लागू होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

अनुमान

उक्त निरिक्षणे विचारात घेता, प्रतिवादी क्र २ यांनी मागणी केलेली सर्व कागदपत्रे संस्थेने प्रतिवादी क्र १ यांच्या दि १५.१२.२०२५ रोजीच्या कलम १५४ ब २७ अन्वयेच्या निर्देशानंतर देखील पुरविली नसल्याचे दिसून येते. संबंधित कागदपत्रातील काही कागदपत्रे विलंबानंतर देखील प्रतिवादी क्र २ यांना उपलब्ध झाली नसल्याचे निरीक्षण नोंदवून, प्रतिवादी क्र १ यांनी अर्जदार यांना नैसर्गिक न्यायतत्वानुसार सुनावणीची संधी दिल्यानंतरच दि १९.०६.२०२६ रोजीचा आदेश पारीत केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. कागदपत्रांची पुर्तता, त्याबाबतचा कलम १५४ ब ८ मध्ये नमूद असलेला अवधी व प्रतिवादी क्र २ यांनी भरणा केलेली रक्कम विचारात घेता प्रतिवादी क्र २ यांनी सादर केलेले मा उच्च न्यायालयाचे निर्णय सदर प्रकरणास लागू होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामूळे प्रतिवादी क्र १ यांचे आदेशास स्थगिती देणे उचित होणार नाही या निर्णयाप्रत मी आलो आहे.

आदेश

१. अर्जदार यांचा स्थगिती अर्ज अमान्य करणेत येत आहे.
२. पुनरिक्षण अर्ज क्र २२६ / २०२६ ची पुढील सुनावणी दि १८.०८.२०२६ रोजी ठेवण्यात येत आहे.
३. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

सदरचा आदेश आज दिनांक ३० .०७.२०२६ रोजी माझे सही व शिक्कयानिशी देत आहे.

विभागीय सह-निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र शासन सत्यमेव जयते पुणे विभाग, पुणे

(दिग्विजय आहेर)
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे

जाक्र विसनि / अपिल / पुन अर्ज क्र २२६ / २०२६ / ८९६ /सन २०२६
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे विभाग, पुणे यांचेकार्यालय

साखरसंकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
दिनांक ३० .०७.२०२६

प्रति,

१. श्री विशाल गोकुळ शिंदे
२. श्री विनायक वसंत लोखंडे
३. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे
४. श्री सादिक जाफर
५. मार्वल आल्बेरो सहकारी गृहरचना संस्था मर्या, कोंढवा बु., पुणे
६. श्री निलेश माणिकराव कामठे
७. श्री अमोल कोंडे

विभागीय सह-निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन, सत्यमेव जयते, पुणे विभाग, पुणे

(दिग्विजय आहेर)
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे